## संक्रांत ....

आकाशाची कढई करुनि
हलवा करते रजनीराणी
युगे लोटली तरीही अजुनि
येई न संक्रमण ॥ १ ॥

मंगळ शोभे केशरीदाणा
गोल शुक्र हा जणू फुटाणा
इतर तीळ अन् साबुदाणा
हलवा झाला छान ॥ २ ॥

खट्याळ रविने बेत योजिला
तेज रसाचा कलश सांडिला
पाकामध्ये हलवा विरला
रोज असे घडते ॥ ३ ॥

**सुमतीबाई दामले**
(पूर्वप्रसिध्दी : 'प्रसाद' मासिक १९५०)